**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAY-JUNE, 2021, VOL- 8/65*
*https://doi.org/10.21922/srjis.v8i65.1353*

# आदिवासी स्त्री जीवन

**विनोद विठ्ठलराव जाधव, Ph. D.**
*समाजशास्त्र विभाग प्रमुख, मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय, औराद शहाजानी ता. निलंगा जि. लातूर*

**Paper Received On:** 21 JUNE 2021
**Peer Reviewed On:** 30 JUNE 2021
**Published On:** 1 JULY 2021

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना :**

जगातील सर्वच देशात कमी अधिक प्रमाणात आदिवासी समाज आढळून येतो. जगाच्या तूलनेत भारतातील आदिवासींची लोकसंख्या लक्षणिय आहे. डोंगर, द-या खो-यामध्ये राहणारा हा समाज प्रगत समाजापासून अलिप्त आहे. भारताच्या चौफेर दिशांनी आदिवासी विखूरलेला आहे. त्यांना वेगवेगळ्या नावानी संबोधले जाते. ठक्कर बाप्पा यानी ‘मुळ निवासी’ डॉ.धूर्ये यांनी ‘मागासलेले हिंदु’ एलविन यांनी ‘गिरीजन’ तर भारतीय राज्यघटनेत ‘अनुसूचित जमाती’ असा उल्लेख आहे. गिलीन व गिलीन यांच्यामते, “एका विशिष्ठ भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतीक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या व्यक्तिच्या समुच्चयाला आदिवासी असे म्हणतात.” आदिवासी मध्ये अनेक जाती, उपजाती आहेत. प्रत्येकाची जीवनपध्दती, मुल्य, श्रध्दा, आचार-विचार,प्रथा-परंपरा ठरलेली आहे. त्या त्या विशिष्ठ भूप्रदेशातच ती जात मोठ्या प्रमाणात आढळून येते.

आदिवासीचा जेव्हा सभ्य समाजाशी संपर्क आला तेव्हा त्यांच्या जीवनात परिवर्तनाला सुरुवात झाली. हा समाज विकासापासून कोसो दूर होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आदिवासींच्या विकासाकडे लक्ष देण्याचा मोठ्या प्रमाणात प्रयत्न झालेला दिसून येतो. यासाठी शासकिय पातळीवरुन प्रयत्न तर झालेले आहेतच पण समाजसुधारकांचेही योगदान विसरता येणार नाही. आज आदिवासी समाजाचा पूर्णपणे विकास झालेला नसला तरी तो विकासाच्या प्रवाहामध्ये नक्कीच सहभागी झालेला आहे. या सहभागामध्ये आदिवासी स्त्रीचा मोठ्या प्रमाणात हातभार आहे. आदिवासी समाजातील स्त्री हि पुरुषाबरोबर सर्व कामे करते. मातृसत्ताक कुटूंब पध्दती मध्ये स्त्रीच सर्वस्वी असल्याचे निदर्शनास येते. म्हणून प्रस्तूत अध्ययनात आदिवासी समाजातील स्त्री जीवनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**अध्ययनाचा उद्देश :**

आदिवासींचे स्त्रीजीवन या विषयाची निवड करत असताना कांही महत्त्वपूर्ण उद्देश गृहित धरले होते. या उद्देशाशिवाय संशोधनाचा प्रवास निश्चित होणार नाही.

1) आदिवासी समाजातील स्त्रीजीवनाचे अध्ययन करणे.

2) विविध कार्यक्षेत्रातील स्त्रीजीवनाचा शोध घेणे.

**अध्ययनाची गृहितकृत्य :**

संशोधक या नात्याने अध्ययन विषयाशी सुसंगत असे गृहितकृत्य मांडून त्यानूसार संशोधन केलेले असून संशोधनाची गृहितकृत्य पुढीलप्रमाणे आहेत.

1) आदिवासी समाजात स्त्रियांचे स्थान दुय्यम स्वरुपाचे आहे.

2)आदिवासी समाजातील स्त्रियांच्या दर्जात परिवर्तन होत आहे.

**तथ्य संकलन :**

संशोधनासाठी तथ्य संकलन अनिवार्य असते म्हणून प्रस्तूत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करुन तथ्य संकलन केलेले आहे.

**1) कौटुंबीक जिवन :**

आदिवासी समाजातील स्त्रियांच्या कौटुंबीक जीवनाचा आढावा घेतला असता. आदिवासी समाजात मातृसत्ताक व पितृसत्ताक या दोन्ही कुटुंबपध्दती पहावयास मिळतात. मातृसत्ताक कुटुंबपध्दतीमध्ये वंशपरंपरा मातेच्या नावाने चालवला जातो, विवाहानंतर मुलगी पतीच्या घरी न जाता मातेच्याच घरी वास्तव्य करते, कुटुंबातील संपत्तीवर मातेचाच अधिकार असतो. धार्मिक, सामाजिक व राजकिय कार्यात स्त्रियांनाच विशेष अधिकार असतात. कुटुंबातील सर्व सदस्यावर मातेचे म्हणजेच स्त्रीचे नियंत्रण असते. मातृसत्ताक कुटुंबपध्दती मध्ये पुरुषांचा दर्जा हा दुय्यम स्वरुपाचा लेखला गेला नाही. त्यांचा नेहमी आदरच केला जातो.

भारतीय समाजात खासी, तोडा, नायर, इरावन व गारो या जमातीमध्ये मातृसत्ताक कुटुंब पध्दती आढळून येते. पितृसत्ताक कुटुंबपध्दतीमध्ये पुरुषांची सत्ता असल्यामुळे मातृसत्ताक कुटुंबपध्दतीच्या तुलनेत स्त्रीचे स्थान दुय्यम स्वरुपाचे दिसून येते.

**2) आर्थिक जीवन :**

मानवी जीवनात आर्थिक घटकाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. आर्थिक घटकावरच सर्व कांही अवलंबून असते. जी व्यक्ती आर्थिक उत्पन्नाची कार्य करते त्यालाच कुटुंब व समाजात मानाचे स्थान प्राप्त होते. त्यावरच त्यांचा दर्जा ठरविला जातो. आदिवासी समाजातील स्त्रियांच्या आर्थिक जीवनाचा विचार केला असता कुटुंबाच्या आर्थिक कार्यात स्त्रीचा मोठा वाटा असतो. जंगलाच्या सानिध्यात राहत असल्यामुळे जंगलातील बांबू, लाकूड यापासून शोभेच्या वस्तू तयार करणे, बेताच्या खूर्ची,टेबल, फुलदानी, टोपली, चटई, सोफा तयार करणे, विशेषत: सुत कातने, दोर वळणे, मडकी तयार करणे, धातूकाम यासारखी लहान-मोठी कामे करुन त्याची विक्री

केली जाते. त्यातून मिळालेल्या पैशातून कुटूंबाचा चरीतार्थ भागविला जातो. एवढेच नाही तर दक्षिण भारतातील ‘इरुला’ जमातीतील स्त्रिया चटई बनविण्यासाठी प्रसिध्द आहेत. कांही जमातीतील स्त्रिया पशूपालन करतात तर कांही शिकारीसाठी आपल्या पतीबरोबर जातात. थोडक्यात आदिवासी स्त्री ही मेहनती व उद्योगी असल्याचे स्पष्ट होते.

**3) जात पंचायत, राजकारण आणि स्त्री :**

आदिवासी समाजात जात पंचायतीचे स्थान महत्वपुर्ण आहे. जात पंचायतीच्या माध्यमाद्वारे गावातील वाद-विवाद सोडविण्याचे व न्यायदानाचे कार्य केले जाते. या जात पंचायतीत समाजातील जेष्ठ व वृध्द व्यक्तीचा समावेश असतो. पंचायतीचा प्रमुख हा इतर सदस्याच्या मदतीने न्यायदानाचे कार्य करतो. गावातील सर्व प्रकारचे तंटे जातपंचायतीसमोर मांडले जातात. जात पंचायत म्हणजे आदिवासी समाजाचे न्यायालय आणि पंच म्हणजे न्यायदेवता. जात पंचायतीच्या खटल्यात दोषी आढळणा-या व्यक्तीवर चाबकाचे फटकारे मारणे, बहिष्कार टाकणे, आर्थिक दंड देणे, गावातून हद्दपार करणे, गाढवावर बसवून धिंड काढणे, गावजेवण देणे यासारखी शिक्षा दिली जाते. जातपंचायतीचा निर्णय प्रमाण मानून सर्वजन त्याच्या आदेशाचे पालन करतात. हे जरी सत्य असले तरी जातपंचायतीमध्ये स्त्रियांचा सहभाग पहावयास मिळत नाही. आदिवासी समाजातील जातपंचायातीपासून महिलांना वंचित ठेवले जाते.

थोडक्यात आदिवासी समाजातील जात पंचायत आदिवासींच्या जीवनावर नियंत्रण ठेवून त्यांच्या लोकजीवनाचे संचालन करते, गावातील चांगल्या वाईट घटनेची दखल घेते. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासन किंवा प्रशासनाच्या हस्तक्षेपामूळे, कायद्याचे राज्य आल्यामुळे जातपंचायतीचे महत्व कमी होवून त्याची जागा आता ग्रामपंचायतीने घेतली आहे. आधुनिक ग्रामपंचायतीत स्त्रियांचा सहभाग वाढत आहे. त्यांना कायदेशीर अधिकार प्राप्त होत असल्यामूळे आदिवासी स्त्रिया ग्रामपंचायतीच्या माध्यमाद्वारे गावगाडा चालविण्याचे प्रभावी कार्य करीत आहेत. गावगाड्यात स्त्रियांच्या मताला, निर्णय प्रक्रियेला महत्व प्राप्त होत आहे. ऐकेकाळी जातपंचायतीपासून दूर असलेली स्त्री आज ग्रामपंचायतीच्या राजकाराणापासून ते पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या राजकारणात सक्रिय सहभागी होवून प्रमुख पदावर विराजमान होऊन आपल्या कार्याचा ठसा प्रभाविपणे उमटवत आहे.

**4) शिक्षण आणि स्त्री :**

आदिवासी समाजाची शिक्षणविषयीची मते इतर समाजापेक्षा वेगळी आहेत. आदिवासी समाज हा प्रगत समाजापासून कोसो दूर असल्यामुळे यांचा पारंपारिक शिक्षणावर भर आहे. पारंपारिक शिक्षण हे युगाग्रह, घरातील मोठी व्यक्ती, मित्र-मैत्रिणी, शेजारी, आप्तस्वकिय यांच्याकडून मिळते. यामध्ये आदिवासीची संस्कृती, कला, पारंपारिक ज्ञान, रितीरीवाज, शेती व शेतीशी निगडीत कामे, घर बांधणी, घर दुरुस्ती, शिकार करणे, मासेमारी आणि त्यासाठी लागणारी साधणे, हत्यारे बनविणे, जडी-बुटी, झाडपाल्याचे औषधी महत्व, मंत्र-तंत्र, जादू, पर्यावरण रक्षण, आरोग्य इ. प्रकारचे पारंपारिक शिक्षण मिळते. हे शिक्षण देत असताना स्त्री आणि पुरुष असा दुजाभाव केला जात नाही.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

पुस्तकी शिक्षणपासून आदिवासी समाज कोसो दूर असल्यामुळे शासनाच्या स्तरावरुन आदिवासी शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न होत आहेत. त्याला आदिवासींचा पाठींबाही मिळत आहे. मुलीच्या शिक्षणाचा विचार केला असता आदिवासी समाज फारतर आपल्या गावातच आपल्या मुलीला शिक्षणासाठी पाठवतात. बाहेरगावी मुलींना शिक्षणासाठी पाठविण्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

**5) राहणीमान आणि स्त्री :**

आदिवासीचे राहणीमान हे अत्यंत साधे पण वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रथा-परंपरेनुसार त्यांच पोषाख आहे. ज्यामध्ये पुरुष लंगोटी व कमरेला झाडपाला गुंडाळतात. किंवा कमरेला वस्त्र आणि डोक्यावर पागोटे बांधतात. तर स्त्रिया लूगडे नेसतात. त्या पुर्वी चोळी घालत नव्हत्या. नवीन पिढीमध्ये पोषाखाच्या बाबतीत बदल होतना दिसून येत आहे.

आदिवासी स्त्रियांच्या हात, पायावर व कपाळ-पाटीवर भरपूर गोंदण असते. या गोंदणामध्ये फुले, झाडे, मोर, त्रिकोण, चौकोण, प्राणी, पक्षी, देव-देवता, सुर्य, चंद्र व चांदणी यासारखे चित्र पहावयास मिळते. आदिवासी समाजातील स्त्रियांसाठी गोंदण हे सौभाग्याचे लक्षण मानले जाते. ज्या स्त्रीने गोंदण केलेले आहे त्यांनाच मृत्युनंतर स्वर्गात प्रवेश मिळतो असा समज आहे.

आदिवासी समाजातील स्त्रियांमध्ये दागिण्यांना विशेष महत्व आहे. यामध्ये बिछवा,कुडी, निगडी, सुत्रापायरी, पायपट्टी, पैंजन, जोडवे, कमरपट्टा, नथ, कर्णफुले, झुंबा, आंगठी, बांगड्या, सापाच्या आकाराचे तोडे इ.चा.समावेश केला जातो. दागिणे हे साधारणत: पितळ व जर्मन या धातूचेच असत मात्र ज्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे. अशा कुटुंबातील स्त्रियाच जर्मन व पितळ या धातूबरोबरच चांदी व सोन्याची दागिणे परिधान करत. सोन्याची दागिणे परिधान करणा-या स्त्रियांचे प्रमाण अत्यल्प आहे.

**निष्कर्ष :**

1) आदिवासी समाजातील स्त्री जीवनाचे अध्ययन केले असता स्त्रीचे स्थान हे पुरुषांच्या बरोबरीचे नसले तरी ते इतर समूदायाच्या तूलनेत ब-यापैकी आहे.

2) पितृसत्ताक कुटुंब पध्दतीच्या तुलनेत मातृसत्ताक कुटुंबातील स्त्रीला जास्तीचे अधिकार आहेत.

3) अर्थोत्पादनात आदिवासी स्त्री पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत आहे.

4) परंपरागत जा पंचयतीपासून आदिवासी स्त्रीला वंचीत ठेवले असले तरी आधूनिक ग्रामपंचायतीमध्ये पर्यायाने राजकारणामध्ये तीचा सहभाग वाढत आहे.

5) आदिवासी समाजातील स्त्री शिक्षणाचे प्रमाण चिंताजनक आहे.(अत्यल्प)

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

संदर्भ :

*Gore, Babasaheb and Deshmukh, Ulka. 2014. Recent Trends in family and Marriage Institutions. Latur : Jyotichand Publication*
*देवगावकर, एस.जी.2009. सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन, नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन*
*भागवत, विद्यूत. 2005. स्त्री प्रश्नाची वाटचाल (संपा.) पूणे : प्रतिभा प्रकाशन*
*पवार, उर्मिला, मीनाक्षी, मुन.2010. आम्ही ही इतिहास घडवला, पुणे: सुगावा प्रकाशन*
*खडसे, भा.कि.2002. जाती व वर्ग आणि भारतीय आदिवासी, नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.*
*घोलप, बापू. 2017. प्रिंट एरिया.बीड : हर्षवर्धन पब्लिकेशन*
*साने,गीता. भारतीय स्त्री जीवन. मुंबई : मौज प्रकाशन गृह*